Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

दैनिक

अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ बीड महाराष्ट्र | मंगळवार, 17 नोव्हेंबर 2026 | अंक क्र. 177 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

महाराष्ट्रात थंडी, ऊन आणि पावसाचा तिहेरी अनुभव; 'अकवन' चक्रीवादळामुळे विदर्भात पावसाचा इशारा

हे चक्रीवादळ 20 नोव्हेंबर रोजी आंध्र प्रदेश आणि यानमच्या किनारपट्टीवर धडकण्याचा भारतीय हवामान विभागाचा (IMD) अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील काही भागांतही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे

■ मुंबई: वृत्तसंस्था

महाराष्ट्रात सध्या हवामानाचे वेगवेगळे रूप पाहायला मिळत आहे. उत्तर महाराष्ट्र आणि घाटमाथ्याच्या भागात थंडीचा कडाका जाणवत असताना, काही ठिकाणी दिवसा उन्हाचा चटका वाढला आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरात तयार झालेले 'अकवन' (Akvan) चक्रीवादळ अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. हे चक्रीवादळ 20 नोव्हेंबर रोजी आंध्र प्रदेश आणि यानमच्या किनारपट्टीवर धडकण्याचा भारतीय हवामान विभागाचा (IMD) अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील काही भागांतही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

बंगालच्या उपसागरात चक्रीवाaदळ अधिक तीव्र होणार

बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्राचे रूपांतर चक्रीवादळात झाले असून, त्याची तीव्रता वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हे चक्रीवादळ 20 नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास आंध्र प्रदेशातील नेल्लोर आणि तुनीदरम्यानच्या किनारपट्टीवर धडकण्याचा अंदाज आहे. त्यावेळी वाऱ्यांचा वेग ताशी 120 ते 130 किलोमीटर, तर झोतांचा वेग ताशी 145 किलोमीटरपर्यंत पोहोचू शकतो.

महाराष्ट्रात कुठे पावसाची शक्यता?

चक्रीवादळाचा महाराष्ट्रावर थेट परिणाम अपेक्षित नसला, तरी त्याच्या प्रभावामुळे काही भागांत हवामानात बदल होऊ शकतो. हवामान विभागाच्या 16 नोव्हेंबरच्या अंदाजानुसार, 21 नोव्हेंबर रोजी पूर्व विदर्भातील काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस, तर तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे विदर्भातील नागरिकांनी हवामान विभागाच्या पुढील सूचनांकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

उत्तर महाराष्ट्रात थंडी, तर दिवसा उन्हाचा चटका

राज्यात उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे रात्री आणि पहाटे गारठा वाढल्याचे चित्र आहे. उत्तर महाराष्ट्र आणि घाटमाथ्याच्या भागात थंडी जाणवत असून, कोकणातील काही भागांतही तापमानात घट झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र, दिवसा उन्हाचा चटका कायम असल्याने सकाळ-संध्याकाळ गारवा आणि दुपारी उष्णता अशी स्थिती अनुभवायला मिळत आहे. एल निनोच्या प्रभावामुळे आगामी काळातील तापमान आणि मान्सूनच्या वाऱ्यांवर काय परिणाम होणार, याकडे हवामान अभ्यासकांचे लक्ष आहे. मात्र, त्याचा नेमका परिणाम आणि कालावधी याबाबत अधिकृत हवामान अंदाजांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवस महाराष्ट्रातील हवामानात होणारे बदल लक्षात घेऊन नागरिकांनी स्थानिक हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे.



वैद्यनाथ मंदिरासमोर धनुभाऊंचा सेल्फी... अन् सेल्फी पॉईंट झाला व्हायरल

■ परळी (प्रतिनिधी)

माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ. धनंजय मुंडे यांनी आज परळीतील पाचवे ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या आवारात उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईंट व भव्य त्रिशूळ ठिकाणी सेल्फी काढला अन् काही मिनिटातच तो फोटो व्हायरल झाला.

धनुभाऊंचा सेल्फी व्हायरल झाला अन् या सेल्फी पॉईंटला येऊन सेल्फी काढण्यासाठी आता स्थानिक नागरिक तसेच मंदिरात दर्शनाला येणारे भाविक देखील गर्दी करत असल्याचे पाहायला मिळाले. धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून या वैद्यनाथ मंदिर व परिसराचे ३०१ कोटी रुपयांच्या आराखड्यातील अनेक विकासकामे सध्या सुरू आहेत. मुख्य प्रवेश द्वार, दगडी पायऱ्या, स्वागत कमानी, भव्य दर्शन मंडप, पूर्णत्वास आलेले भव्य भक्त निवास अशी अनेक कामे सध्या पूर्णत्वाकडे जात आहेत. दरम्यान धनुभाऊंनी आज सेल्फी काढलेला सेल्फी पॉईंट आज चांगलाच व्हायरल झाला असून तिथे सेल्फी काढण्यासाठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले.





लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीत पतसंस्था मतदार संघातील उमेदवार भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवा नेते ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांनी ऐतिहासीक विजय संपादन केल्यानंतर त्यांची कार्यकर्त्यांनी अभूतपुर्व मोठया जल्लोषात लातूर शहरातील प्रमूख रस्त्यावरून वाजत गाजत फटाक्याची आतिषबाजी करत भव्य विजयी मिरवणूक काढण्यात आली. आ. रमेशआप्पा कराड यांच्या संवाद या संपर्क कार्यालया समोर प्रचंड फटाक्याची आतिषबाजी करून ऋषिकेश कराड यांच्या विजयाचे स्वागत करण्यात आले.

परळी औष्णिक विद्युत केंद्र राज्यात अव्वल : मुख्य अभियंता सुनील इंगळे

५५ व्या वर्धापन दिनानिमित्त महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी., माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, संचालक अभय हरणे, राजेश पाटील, विजय राठोड, मुख्य अभियंता डॉ. अनिल काठोये यांच्याकडून शुभेच्छा!

■ परळी / प्रतिनिधी

परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या ५५ व्या वर्धापन दिनानिमित्त दि १५ रोजी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी (महानिर्मिती)चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांनी शुभेच्छा संदेश पाठवून केंद्राच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला.

आपल्या संदेशात त्यांनी नमूद केले की, परळी औष्णिक विद्युत केंद्राने सातत्यपूर्ण आणि अखंड वीजनिर्मिती करून राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. केंद्रातील विविध संचांनी सलग अनेक दिवस अखंड वीजनिर्मितीचा विक्रम प्रस्थापित केला असून, या कामगिरीमुळे महानिर्मितीची विश्वासार्हता अधिक बळकट झाली आहे. बदलते तंत्रज्ञान, वाढती स्पर्धा आणि भविष्यातील आव्हाने लक्षात घेऊन 'व्हिजन-२०३५' अंतर्गत नियोजनबद्ध पद्धतीने नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प आणि स्थापित वीजनिर्मिती क्षमतेच्या वाढीवर भर दिला जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

केंद्राच्या सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांतर्गत परिसरातील विद्यार्थ्यांसाठी नवीन शालेय इमारती उभारण्यात आल्या असून त्याचा लाभ विद्यार्थ्यांना होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. वर्धापन दिनानिमित्त अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी क्रीडा, सांस्कृतिक व मनोरंजनपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून हा सोहळा सामुदायिक ऊर्जा आणि एकात्मतेचा उत्सव ठरावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे प्रत्यक्ष उपस्थित राहता येत नसल्याची खंत व्यक्त करत त्यांनी सर्व अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी, कंत्राटदार, कंत्राटी कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना ५५ व्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी सांगितले की, परळी औष्णिक विद्युत केंद्राने सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर राज्यात अव्वल स्थान कायम राखले आहे. राज्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता पाण्याचा काटेकोर व सुयोग्य वापर करून वीजनिर्मितीवर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच प्रभावी नियोजनामुळे वीजनिर्मितीचा खर्च प्रति युनिट ४ रुपये २० पैसे इतका कमी करण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. पाणी व्यवस्थापनाला सर्वोच्च प्राधान्य देत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सकारात्मक सूचना देऊन या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले.



या वर्धापन दिन सोहळ्याचे उद्घाटन परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मल्हार शिवकर यांच्या हस्ते झाले. मंचावर प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, अधीक्षक अभियंता राजू रेड्डी, सौ. अनिता इंगळे, सौ. रुपाली रेड्डी, प्रभारी अधीक्षक अभियंता एस. ए. सनाके, विजय सर्वज्ञ, सचिन पेटकर, सुरेश गर्जे, सचिव डी. एस. फड, अविनाश खरसडे, शशिकांत केंद्रे आदी उपस्थित होते.

कामगार नेते हरिराम गित्ते यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यकारी अभियंते शीलरत्न मेश्राम व पंकज दगडे, थर्मल कॉन्ट्रॅक्टर्स अँड सप्लायर्स संघटनेचे अध्यक्ष अंगद हाडबे, शिवाजी बिडगर, भगवान साकसमुद्रे, मुजाभाऊ गरड, सौ. ज्योती राठोड, सौ. किष्किंदा गित्ते, राजाभाऊ घुले, संदीप पाटील, सुरक्षा अधिकारी सचिन पवार यांच्यासह अनेक अधिकारी, कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात "पाणी वाचवा" हा सामाजिक संदेश देणारे पत्रवाचन आक्रूर साळुंके व संतोष चतुर्भुज यांनी सादर केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी उपमुख्य अभियंता एस. एम. बुकतारे यांनी केले. सूत्रसंचालन सोनाली डोंगरे व महेश मुंडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी केले.



छत्रपती संभाजी महाराज चौकात खड्डे,घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य; व्यवसायिक व नागरिक त्रस्त

नालीचे पाणी खड्यात व रस्त्यावर साचल्याने विद्यार्थी, व्यवसायिक, नागरिक व बाहेरून येणाऱ्या भाविकांना त्रास; प्रशासनाने तात्पुरती उपाय योजना न करता तात्काळ कायम स्वरूपी उपाययोजना करावी – सामाजिक कार्यकर्ते बालाजी चाटे







परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरात खड्डे,घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले असून, प्रशासनाने या पूर्वी देण्यात आलेल्या सर्व वर्तमानपात्रा तील बातम्याची तात्काळ दखल घेऊन तात्पुरती उपाययोजना केली होती. मात्र आता तोच प्रश्न पुन्हा आयरनिवर आला असून नालीच्या घाण पाण्याचा व खड्याचा प्रश्न कायम स्वरूपी मार्गी लावावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बालाजी चाटे यांनी केली आहे. या समस्येमुळे हॉटेल, पानपट्टी, ऑटोमोबाईल, किराणा व्यवसायिक,विद्यार्थी, नागरिक तसेच परळीत बाहेरून येणाऱ्या भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरातील उड्डाणपुलाच्या बाजूने इराणी वस्ती पासून व शिवाजीनगर भागातून येणारे नालीचे पाणी थेट छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरात येत आहे. हे पाणी रस्त्यावरील खड्यात साचत असल्याने परिसरात चिखल, घाण आणि दुर्गंधी पसरली आहे. हा रस्ता अत्यन्त राहादारीचा असल्यामुळे नागरिकांना या साचलेल्या दूषित पाण्यातून मार्ग काढावा लागत आहे.

R K वाईन ते चेंबरी रेस्ट हाऊस पर्यंत जुनी नाली असून ती जर तात्काळ चालू करून या नालीत पाणी सोडून दिल्यास पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होईल.

चौक ते उड्डाणं पूल तसेच चौक ते गंगाखेड पर्यंत सिमेंट रोड झालेला आहे परंतु चौक ते चेंबरी रेस्ट हाऊस ते गोपीनाथराव मुंडे चौक पर्यंत रोड मंजूर असून अदयाप पर्यंत झालेला नाही,त्यामुळे चौकातील रस्त्यावर खूप मोठया प्रमाणात खड्डे पडले असून त्यात नालीचे घाण पाणी साचत आहे. त्यामुळे

या परिसरात विविध साथीचे आजार तसेच डेंग्यूची भीती आहे,रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

प्रशासनाने तातडीने खड्डे,स्वच्छता व पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

बाहेरून परळीत येणाऱ्या नागरिक व भाविकांचे घाण पाण्यातून मार्ग काढत स्वागत होत आहे, अशी परिस्थिती निर्माण झाली असून,परळी शहराची प्रतिमा अत्यन्त खराब होत असल्याचे बालाजी चाटे यांनी म्हटले आहे. विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनचालकांना दररोज या घाण पाण्यातुन मार्ग काढावा लागतं असून अपघाता सारख्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

नगरपरिषद व संबंधित प्रशासनाने या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून नालीच्या पाण्याचा कायमस्वरूपी निचरा करावा, रस्त्यावर साचलेले पाणी हटवावे तसेच परिसराची स्वच्छता करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बालाजी चाटे यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील बोअरवेल निर्बंध उठवा – नुमान चाऊस

बीड : जिल्ह्यातील भूजल पातळी खालावत असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने २ नोव्हेंबर २०२६ पासून नवीन बोअरवेल व विहिरी खोदण्यासाठी निर्बंध लागू केले आहेत. या निर्णयामुळे शेतकरी आणि पाणीटंचाईने त्रस्त सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी या निर्णयाचा पुनर्विचार करून निर्बंध उठविण्याची मागणी केली आहे. भूजल संरक्षण आवश्यक असले तरी शेतकऱ्यांना पिके, फळबागा आणि जनावरे वाचविण्यासाठी पाण्याची गरज आहे. त्यामुळे गावनिहाय भूजल परिस्थितीचा अभ्यास करून निर्बंध उठवावेत किंवा आवश्यक त्या ठिकाणी शिथिल करावेत. तसेच गरजू शेतकरी आणि पिण्याच्या पाण्यासाठी अडचणीत असलेल्या कुटुंबांना विशेष सवलत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. भूजल संरक्षणाला आमचा विरोध नाही; मात्र त्याच्या नावाखाली शेतकरी आणि सामान्य नागरिकांच्या पाण्याच्या गरजांकडे दुर्लक्ष होता कामा नये. जिल्हाधिकाऱ्यांनी जनतेच्या अडचणी लक्षात घेऊन बोअरवेल निर्बंध तातडीने उठवावेत किंवा शिथिल करावेत, अशी ठाम मागणी मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केली आहे.



परळी तालुक्यात प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचा लाभ

परळी (प्रतिनिधी)

येथील एस.बी.आय. बँकेच्या वतीने प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेंतर्गत (PMJJBY) एका शेतकऱ्याच्या कुटुंबाला मोठा आधार मिळाला आहे. तालुक्यातील नंदनज येथील रहिवासी शेतकरी श्री. चंद्रकांत जगन्नाथ गुट्टे यांच्या पत्नीच्या आकस्मिक निधनानंतर, त्यांना दोन लाख रुपयांचा विमा परतावा धनादेशाद्वारे सुपूर्द करण्यात आला. बँक अधिकारी आणि ग्राहक सेवा केंद्र संचालक प्रवीण मानधने यांच्या हस्ते हा धनादेश वाटप करण्यात आला.

सविस्तर वृत्त असे की, परळी तालुक्यातील नंदनज येथील लाभार्थी शेतकरी चंद्रकांत जगन्नाथ गुट्टे यांनी एस.बी.आय. बँकेअंतर्गत प्रधानमंत्री



जीवन ज्योती विमा योजना उतरवली होती. दुर्दैवाने, ८ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांच्या पत्नी सौ. ललिता चंद्रकांत गुट्टे यांचे आकस्मिक निधन झाले. या दु:खाच्या प्रसंगात विमा योजनेचा आधार मिळाला.

२०२५ मध्ये उतरवलेल्या एस.बी. आय. च्या विमा योजनेंतर्गत, त्यांना नुकताच परळी येथील ग्राहक सेवा केंद्राचे प्रमुख प्रवीण मानधने यांच्या विशेष प्रयत्नातून दोन लाख रुपयांचा विमा परतावा एस.बी.आय. बँकेकडून मिळवून देण्यात आला. नंदनज गावात या विमा योजनेचा परतावा मिळण्याची ही तिसरी घटना आहे.

हा धनादेश सुपूर्द करताना एस.बी. आय. बँकेचे व्यवस्थापक विजयजी तिरपुडे सर, दिपक शेंगुळेसर , विलासजी राठोड सर , राहुल सर, भुपेंद्र लारोलकर, शरद सर, अनिल सर, आणि प्रिया मरकड मॅडम उपस्थित होत्या. तसेच, ग्राहक सेवा केंद्र चालक प्रवीण मानधने, नंदनज गावचे सरपंच सुनील गुट्टे, आणि व्यापारी मित्र बळदवा आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेंतर्गत मिळालेल्या या लाभामुळे लाभार्थी शेतकरी चंद्रकांत गुट्टे यांनी एस.बी.आय. बँक प्रशासन आणि विशेषतः ग्राहक सेवा केंद्र चालक प्रवीण मानधने यांचे आभार मानले आहेत. कठीण काळात मिळालेली ही आर्थिक मदत कुटुंबासाठी मोठा आधार ठरली आहे.

अंबाजोगाईच्या रेल्वे स्वप्नासाठी डॉ. आदित्य पतकराव यांचा पुढाकार! २६ नोव्हेंबरच्या बैठकीत नवीन रेल्वे स्टेशनचा प्रस्ताव मांडणार

घाटनांदूर-श्रीगोंदा रेल्वे सर्वेक्षण पुन्हा सुरू करण्याची मागणी; पर्यायी रेल्वे मार्गाचाही पर्याय! यापूर्वी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री व्ही. सोमण्णा आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडेही पाठपुरावा.

अंबाजोगाई | प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर आणि परिसरातील नागरिकांचे अनेक वर्षांपासूनचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आता ठोस पातळीवर प्रयत्न सुरू झाले आहेत. मध्य रेल्वेच्या पुणे विभागीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य डॉ. आदित्य दगडू पतकराव हे येत्या २६ नोव्हेंबर २०२६ रोजी होणाऱ्या रेल्वेच्या महत्त्वपूर्ण बैठकीत अंबाजोगाई येथे नवीन रेल्वे स्टेशन सुरू करण्याचा अधिकृत प्रस्ताव मांडणार आहेत.

अंबाजोगाईला रेल्वेच्या नकाशावर स्थान मिळावे, यासाठी डॉ. पतकराव दोन महत्त्वाचे पर्याय रेल्वे प्रशासनासमोर मांडणार आहेत. यामध्ये २०१६ मध्ये मंजूर झालेला घाटनांदूर-श्रीगोंदा रेल्वे सर्वेक्षण प्रकल्प पुन्हा सुरू करावा, तसेच या प्रकल्पाला गती द्यावी, अशी मागणी करण्यात येणार आहे. हा मार्ग शक्य नसल्यास अंबाजोगाईला जोडणारा पर्यायी रेल्वे मार्ग निश्चित करून शहरात नवीन रेल्वे स्टेशन सुरू करण्यात यावे, अशी आग्रही भूमिका ते मांडणार आहेत.

■ केंद्रीय रेल्वे मंत्र्यांपर्यंत पोहोचवला अंबाजोगाईचा रेल्वे प्रश्न!

विशेष म्हणजे, डॉ. आदित्य पतकराव यांनी अंबाजोगाईच्या रेल्वे प्रश्नासाठी यापूर्वीही रेल्वे मंत्रालयाच्या पातळीवर पाठपुरावा केला आहे. दिल्ली येथे रेल्वे मंत्रालयात झालेल्या बैठकीदरम्यान त्यांनी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री व्ही. सोमण्णा यांच्याकडे अंबाजोगाई येथे नवीन रेल्वे स्टेशन सुरू करण्याची मागणी केली होती.

तसेच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडेही डॉ. पतकराव यांनी यापूर्वी अंबाजोगाईच्या नवीन रेल्वे स्टेशनसंदर्भात प्रस्ताव सादर केला आहे. त्यामुळे ही मागणी केवळ एका बैठकीपुरती मर्यादित नसून, रेल्वे मंत्रालयाच्या स्तरावरही यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे स्पष्ट होते.

■ २६ नोव्हेंबरच्या बैठकीत अधिकृत प्रस्ताव!

मध्य रेल्वेच्या पुणे विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयाकडून डॉ. आदित्य पतकराव यांना २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता होणाऱ्या बैठकीचे अधिकृत निमंत्रण प्राप्त झाले आहे. पुणे येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये ही बैठक होणार आहे.

बैठकीच्या निमंत्रण पत्रामध्ये समिती सदस्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात नवीन रेल्वे स्टेशन सुरू करण्यासंदर्भातील प्रस्ताव मांडण्याची तरतूद नमूद करण्यात आली आहे. या संधीचा उपयोग करून अंबाजोगाईच्या रेल्वे प्रश्नाला अधिकृत व्यासपीठावर मांडण्यात येणार आहे.

■ बीड जिल्ह्यातील रेल्वे विकासाचा लाभ अंबाजोगाईलाही मिळावा!

नुकतेच बीड येथे रेल्वे स्टेशन कार्यान्वित झाले असून बीड जिल्ह्यातील रेल्वे स्थानके मध्य रेल्वेच्या पुणे विभागाच्या कार्यक्षेत्रात येतात. अंबाजोगाई हे बीड जिल्ह्यातील महत्त्वाचे शैक्षणिक, वैद्यकीय आणि व्यापारी केंद्र असल्यामुळे या शहराला रेल्वेने जोडण्याचा प्रस्ताव रेल्वे प्रशासनाने गांभीर्याने विचारात घ्यावा, अशी भूमिका डॉ. पतकराव मांडणार आहेत.

■ अंबाजोगाईला रेल्वे मिळाल्यास विकासाला मोठी चालना!

अंबाजोगाई हे मराठवाड्यातील महत्त्वाचे धार्मिक, शैक्षणिक, वैद्यकीय आणि व्यापारी केंद्र आहे. स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, योगेश्वरी मंदिर, विविध शैक्षणिक संस्था आणि आरोग्यसेवांमुळे राज्याच्या विविध भागांतून नागरिक अंबाजोगाईत येत असतात. मात्र, थेट रेल्वे सुविधा नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

अंबाजोगाईला रेल्वेने जोडल्यास बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या दळणवळण, व्यापार, पर्यटन, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राला मोठी चालना मिळू शकते.

"अंबाजोगाईला रेल्वे स्टेशन मिळणे ही केवळ एका शहराची मागणी नसून संपूर्ण परिसराच्या विकासाची गरज आहे. यासाठी यापूर्वीही केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री आणि रेल्वेमंत्र्यांकडे प्रस्ताव मांडले आहेत. आता २६ नोव्हेंबरच्या बैठकीत २०१६ मध्ये मंजूर झालेला घाटनांदूर-श्रीगोंदा रेल्वे सर्वेक्षण प्रकल्प पुन्हा सुरू करण्याची किंवा पर्यायी रेल्वे मार्ग निश्चित करून अंबाजोगाई येथे नवीन रेल्वे स्टेशन सुरू करण्याची मागणी अधिकृतपणे मांडणार आहे. रेल्वे प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करावा, ही अपेक्षा आहे," असे डॉ. आदित्य पतकराव यांनी सांगितले.

आता २६ नोव्हेंबरच्या बैठकीत अंबाजोगाईच्या रेल्वे प्रश्नावर काय चर्चा होते आणि रेल्वे प्रशासन या प्रस्तावाला कसा प्रतिसाद देते, याकडे संपूर्ण अंबाजोगाई तालुक्यासह बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या अंबाजोगाईच्या रेल्वे स्वप्नाला आता मंत्रालयीन पाठपुराव्याची आणि अधिकृत प्रस्तावाची जोड मिळाली आहे. अंबाजोगाईला रेल्वे स्टेशन मिळणार का, याची उत्सुकता नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे!



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

पांदण रस्त्यांसह रोजगार हमी योजनेची जास्तीत जास्त कामे हाती घ्या - आ.धनंजय मुंडे

आ.धनंजय मुंडेंनी परळी मतदारसंघातील दुष्काळासह पांदण रस्ते, रोजगार हमी, चारा - पाणी पुरवठा इत्यादी बाबत घेतला सविस्तर आढावा

तलावातील पाणी उपसा 100% बंद, पिण्याच्या पाण्याचे बारकाईने नियोजन करण्याचे धनंजय मुंडेंचे निर्देश

परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)

परळी मतदारसंघात मुख्यमंत्री बळीराजा शेतकरी पाणंद रस्ते योजनेतून जास्तीत जास्त कामे सुरू करण्याचे नियोजन करण्यासह ग्रामीण मजुरांना रोजगार मिळावा यादृष्टीने रोजगार हमी योजनेतून अधिकाधिक कामे हाती घेण्यात यावीत, अशा सूचना माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी प्रशासनाला केल्या आहेत.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आ धनंजय मुंडे यांनी आज परळी येथील शासकीय विश्रामगृहात प्रशासकीय अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पाणंद रस्ते, रोजगार हमी योजनेतील विविध कामे यांसह दुष्काळ निवारणासंदर्भात विविध उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने प्रदीर्घ व सखोल आढावा घेतला.





चारा टंचाईच्या आगामी संकटाच्या पार्श्वभूमीवर छावण्या किंवा तत्सम उपाययोजना करण्यासंदर्भात शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नियोजन करणे, तसेच विविध साठवण तलावातील १००% पाणी उपसा बंद करून पाणी केवळ पिण्यासाठी आरक्षित करणे, नवीन बोअरवेल साठी संपूर्ण पडताळणी करूनच परवानगी देणे, रब्बी पेरणीचा संपूर्ण अहवाल, धान्य पुरवठा दुकानांमधून तक्रारींचा निपटारा करून योग्य पद्धतीने धान्य वितरण करणे, जनावरांचे आरोग्य शिबिर व लसीकरण करणे इत्यादीबाबतची माहिती घेत आ मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य सूचना केल्या. तसेच परळी मतदारसंघातील उपलब्ध पाणी साठ्याचीही माहिती घेतली.

यावेळी अजय मुंडे, सूर्यभान नाना मुंडे, पांदण रस्ते समितीचे सहअध्यक्ष अमर गित्ते, चंद्रकांत कराड, वैजनाथराव सोळंके, राजाभाऊ पौळ, प्रा. मधुकर आघाव, मोहनराव सोळंके, शरद पाटील राडकर, विनायकराव राठोड, आबासाहेब पांडे, बाबासाहेब काळे, बापूसाहेब गित्ते, माऊली तात्या गडदे तसेच उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार विनोद रणवरे, गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले, तालुका कृषी अधिकारी अर्चना नागरगोजे, यांसह पशु, आरोग्य, जलसंधारण आदी विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

■ चार तासांचा जनता संवाद!

सदरील बैठकीनंतर धनंजय मुंडे यांनी जनता संवाद या त्यांच्या नेहमीच्या उपक्रमांतर्गत शासकीय विश्रामगृह येथे आलेल्या स्थानिक नागरिक, पदाधिकारी, कार्यकर्ते आदींच्या समस्या ऐकून घेत त्यांची कामे मार्गी लावण्यासाठी संबंधितांना योग्य त्या प्रकारे संपर्क करत सूचना दिल्या.

वाढदिवसाचा अनोखा सामाजिक उपक्रम! सानिका नरवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त महागाव पोलीस स्टेशनला वॉटर फिल्टर व वॉटर कुलर भेट

प्रतिनिधी | महागाव

वाढदिवस म्हटला की केक कापणे, फटाके फोडणे आणि मित्रमंडळींसोबत आनंद साजरा करणे, अशी सर्वसाधारण संकल्पना असते. मात्र या परंपरेला फाटा देत सामाजिक बांधिलकी जपत गरजूंसाठी उपयोगी उपक्रम राबविण्याचा आदर्श सौ. जयश्री संजय नरवाडे (नगरसेविका तथा तालुकाध्यक्ष, महिला काँग्रेस कमिटी, महागाव) यांनी घालून दिला आहे.

त्यांची कन्या कु. सानिका संजय नरवाडे या भोपाळ येथील प्रतिष्ठित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (IISER) येथे शिक्षण घेत असून, त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महागाव पोलीस स्टेशन येथे वॉटर फिल्टर आणि वॉटर कुलर भेट देण्यात आला.

महागाव पोलीस स्टेशनमध्ये विविध कामांसाठी दररोज अनेक नागरिक येत असतात. तक्रारी, निवेदने तसेच इतर शासकीय कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी, या सामाजिक जाणिवेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यापूर्वी पोलीस स्टेशनमध्ये येणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दूरवर जावे लागत होते. ही गैरसोय लक्षात घेऊन जयश्रीताई संजय नरवाडे यांनी पुढाकाराने नागरिकांसाठी पिण्याच्या शुद्ध व थंड पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली.



विशेष म्हणजे, शिक्षणाच्या क्षेत्रात प्रगती करत असलेल्या सानिका संजय नरवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ वैयक्तिक आनंद साजरा न करता समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक संवेदनशीलतेचा आणि सेवाभावाचा सकारात्मक संदेश देण्यात आला आहे.

या प्रसंगी ठाणेदार सेवानंद वानखेडे साहेब, पोलीस कर्मचारी तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत नरवाडे परिवाराच्या सामाजिक जाणिवेचे अभिनंदन केले.

वाढदिवसाच्या निमित्ताने केलेली ही छोटीशी भेट अनेक नागरिकांसाठी मोठी सोय ठरणार आहे. समाजातील प्रत्येक घटकाने आपापल्या परीने सामाजिक कार्यात योगदान दिल्यास सार्वजनिक ठिकाणच्या अनेक समस्या सहज दूर होऊ शकतात, याचे उत्तम उदाहरण या उपक्रमातून महागावकरांना पाहायला मिळाले.

अशा उपक्रमांमुळे वाढदिवस साजरा करण्याला केवळ उत्सवाचे स्वरूप न राहता सामाजिक सेवेची जोड मिळते, हीच या उपक्रमाची खरी फलश्रुती आहे.

जव्हार तालुक्यातील रुईघर ग्रामपंचायतीत लोकसहभागातून वनराई बंधाऱ्यांची उभारणी!

सरपंच श्रीमती अंतूना घाटाळ यांच्या पुढाकाराने जलसंधारणाच्या कामाला गती; पावसाचे पाणी अडवून भूजलपातळी वाढविण्याचा प्रयत्न

जव्हार (वा.) | जव्हार तालुक्यातील रुईघर ग्रामपंचायतीच्या वतीने लोकसहभागातून वनराई बंधारे उभारण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती अंतूना अतुल घाटाळ यांच्या पुढाकाराने राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे गाव परिसरातील जलसंधारणाच्या कामाला चालना मिळणार आहे. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे तसेच उन्हाळ्यात निर्माण होणारी पाणीटंचाई कमी करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

जव्हार तालुका हा आदिवासीबहुल आणि डोंगराळ भाग असल्याने येथे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. मात्र, पावसाचे पाणी योग्य प्रकारे अडवून ठेवण्याची व्यवस्था नसल्यामुळे बहुतांश पाणी वाहून जाते. परिणामी उन्हाळ्यात अनेक गाव-पाड्यांमध्ये पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण होतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन रुईघर ग्रामपंचायतीने लोकसहभागातून वनराई बंधारे उभारण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.



वनराई बंधाऱ्यांमुळे ओढे, नाले आणि लहान जलप्रवाहांमधील पाणी अडवून ठेवता येते. त्यामुळे परिसरातील विहिरी, बोअरवेल तसेच जलस्रोतांच्या पाणीपातळीत वाढ होण्यास मदत होते. याचा फायदा गावातील शेतकरी, पशुपालक आणि ग्रामस्थांना होणार आहे. तसेच शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढण्यासही हातभार लागणार आहे.

विशेष म्हणजे, केवळ शासकीय निधीवर अवलंबून न राहता ग्रामस्थांच्या सहभागातून गावाच्या विकासाची कामे उभी करण्याचा प्रयत्न सरपंच श्रीमती अंतूना घाटाळ यांनी केला आहे. लोकसहभागातून राबविण्यात येणारा हा उपक्रम ग्रामीण भागातील जलसंधारणासाठी एक चांगला आदर्श ठरू शकतो.

पाणी अडवा, पाणी जिरवा हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून राबविणाऱ्या रुईघर ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत असून, इतर ग्रामपंचायतींनीही अशा प्रकारचे उपक्रम राबविण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

दिव्यांगांना तुटपुंज्या पेन्शनवर जगवणार किती दिवस; आता तरी थेट ६ हजार रुपये पेन्शन द्या!

आ. विजयसिंह पंडित यांची मंत्री अतुल सावे यांच्याकडे मागणी

गेवराई, (प्रतिनिधी)

महागाईचा आगडोंब उसळला असताना राज्यातील दिव्यांग बांधवांना मिळणारे अवघे अडीच हजार रुपयांचे मासिक अर्थसहाय्य त्यांच्या जगण्यासाठी पुरेसे आहे. औषधोपचार, किराणा, प्रवास आणि दैनंदिन गरजा भागवायच्या तरी कशा? दिव्यांगांनी सन्मानाने जगायचे तरी कसे? असे प्रश्न उपस्थित करत गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी दिव्यांगांच्या मासिक मानधनात थेट पाच ते सहा हजार रुपयांपर्यंत वाढ करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी दिव्यांग सक्षमीकरण मंत्री अतुल सावे यांना दि. १६ नोव्हेंबर रोजी लेखी निवेदन सादर केले आहे.

राज्यातील दिव्यांग बांधवांना सध्या मिळणारे २,५०० रुपयांचे मासिक अर्थसहाय्य वाढत्या महागाईच्या तुलनेत अत्यंत अपुरे आहे. दैनंदिन गरजा भागवतानाच दिव्यांगांना अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकांना औषधोपचार आणि इतर मूलभूत गरजांसाठीही आर्थिक तडजोड करावी लागते. अशा परिस्थितीत सध्याचे



मानधन वाढवून किमान पाच ते सहा हजार रुपये करण्यात यावे, अशी ठाम मागणी आमदार पंडित यांनी केली आहे. दिव्यांग बांधवांना केवळ तुटपुंजे अर्थसहाय्य देऊन त्यांच्या समस्या सुटणार नाहीत. त्यांना सन्मानाने जीवन जगता यावे, आर्थिक स्वावलंबन मिळावे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी आवश्यक आधार मिळावा, यासाठी शासनाने ठोस धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. दिव्यांगांसाठी असलेल्या राखीव निधीचा प्रभावी वापर करून त्यांना घरकुल, शिक्षण, आरोग्य आणि स्वयंरोजगाराच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी निधीची तरतूद असतानाही त्याचा प्रभावी वापर होतो का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. दिव्यांगांच्या नावावर असलेला निधी त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात बदल घडवण्यासाठी खर्च झाला पाहिजे. केवळ कागदोपत्री योजना आणि घोषणांपेक्षा दिव्यांगांच्या हातात आर्थिक मदत आणि प्रत्यक्ष सुविधा पोहोचणे आवश्यक आहे. आमदार विजयसिंह पंडित यांनी उपस्थित केलेला हा प्रश्न केवळ गेवराई मतदारसंघापुरता मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांग बांधवांच्या जगण्याशी आणि स्वाभिमानाशी संबंधित आहे. आता मंत्री अतुल सावे आणि राज्य सरकार या मागणीची कितपत दखल घेणार, दिव्यांगांच्या मानधनात वाढ करण्यासाठी कोणता निर्णय घेणार, याकडे राज्यातील दिव्यांग बांधवांचे लक्ष लागले आहे. दिव्यांगांना केवळ सहानुभूती नको, तर सन्मानाने जगण्यासाठी आर्थिक आधार हवा आहे. त्यामुळे आता आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष निर्णयाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यमुनाताई घुगे व बाळासाहेब घुगे यांच्या विवाहाला २१ वर्षे पूर्ण; शुभेच्छांचा वर्षाव!

नाशिक : न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा सौ. यमुनाताई घुगे आणि भाजप दिव्यांग विकास आघाडीचे ज्येष्ठ नेते, समाजसेवक बाळासाहेब घुगे यांच्या विवाहाला मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी २१ वर्षे पूर्ण होत आहेत.

दिव्यांग बांधवांप्रती असलेली तळमळ, प्रेम, आपुलकी आणि माणुसकीच्या भावनेतून गरजू व गरीब नागरिकांची सेवा करणारे हे दाम्पत्य समाजासाठी आदर्श ठरत आहे. त्यांच्या सामाजिक कार्यामुळे अनेकांना आधार आणि प्रेरणा मिळत आहे.

या लक्ष्मी-नारायणाच्या जोडीला उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य, सुख, समाधान आणि समृद्धी लाभो, तसेच त्यांच्या हातून अशीच समाजसेवा घडत राहो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करण्यात आली आहे.

यावेळी राज्य संयुक्त महामंडळ मुख्याध्यापक संघाचे कोषाध्यक्ष व सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनचे राज्य सहसचिव नागरे बी. के. सर तसेच श्रीरामलीला एज्युकेशन सोसायटी, नाशिकचे अध्यक्ष श्री. रंगनाथ दरगुडे यांनी घुगे दाम्पत्याला विवाहाच्या २१व्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



महाराष्ट्रात प्रा. लक्ष्मण हाके यांनी घेतली विरोधी पक्षनेत्याची भूमिका!

बजरंग सानप यांचे मत; दुष्काळग्रस्त शेतकरी, कष्टकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांवर हाकेंचा आवाज बुलंद



महाराष्ट्रात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा करून शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

राज्यात अनेक राजकीय पक्ष असतानाही शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस आवाज उठवताना नेते दिसत नाहीत. विरोधक सत्तेच्या राजकारणात गुंतलेले असताना प्रा. हाके मात्र थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या मांडत आहेत.

येत्या आठवड्यात ते विदर्भाचाही दौरा करणार असून दुष्काळाची भीषण परिस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देणार आहेत. महाराष्ट्रात विरोधी पक्षनेत्याची उणीव प्रा. लक्ष्मण हाके भरून काढत आहेत, असे मत बजरंग सानप यांनी व्यक्त केले.

दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
● बीड, मंगळवार, 17 नोव्हेंबर 2026
Last page

यशवंतराव चव्हाण स्मृती समिती, अंबाजोगाई तीन दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे आयोजन

अतुल पेठे यांच्या हस्ते उद्घाटन तर न्या. प्रकाश परांजपे यांच्या उपस्थितीत समारोप

उद्घाटन समारंभ, कविसंमेलन,बाल आनंद मेळवा, गझल गायन, समारोप समारंभ, पुरस्कार वितरण व संगीत सभा खास आकर्षण

अंबाजोगाई | प्रतिनिधी:

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने दरवर्षी आयोजित केल्या जाणार्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे यावर्षी ४२ वे वर्ष असून तीन दिवसीय कार्यक्रमात उद्घाटन समारंभ, कवी संमेलन, बालआनंद मेळावा, गझल गायन, शालेय चित्रकला स्पर्धा व बक्षीस वितरण, समारोप समारंभ त्यात वार्षिक यशवंतराव चव्हाण स्मृती विविध क्षेत्रातील मान्यवर यांना पुरस्कार वितरण, शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीत गायन संपन्न होणार आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या विचार व कृतिला अनुसरून आयोजित केलेला समारंभ याची अंबाजोगाई परिसर, मराठवाडा व महाराष्ट्रात ख्याती आहे. अभिरुची असलेला रसिक वर्ग उत्कंठा लावून वाट पाहत असतो. यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराचे पाईक स्व. भगवानराव लोमटे यांच्या कल्पनेतून हा समारंभ सुरू झाला. त्याचे सातत्याने आयोजित केला जातो. या वर्षी त्याचे ४२ वे वर्ष आहे. अशी माहिती यशवंतराव चव्हाण स्मृती समिती अंबाजोगाईचे सचिव दगडू लोमटे यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

■ उद्घाटन व कविसंमेलन

यार्षीच्या समारोहचा उदघाटन बुधवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता पुणे येथील नाटककार, लेखक, अभिनेता व माहितीपटकार अतुल पेठे यांच्या हस्ते उदघाटन होत आहे. तर रात्री ८.३० वा. कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून अध्यक्षस्थानी अमरावती येथील सुप्रसिद्ध कवी, गझलकार नितीन देशमुख हे राहणार असून, कवी संमेलनाचे सूत्रसंचालन इचलकरंजी येथील कवी रोहित शिंगे हे करणार आहेत. तर इतर कवी आत्तम गेंदेल-पालम, रंजना गायकवाड-अहमदपूर, एजाज शेख-अकोला, अपूर्व राजपूत-सोयगाव, विजया टाळकुटे-जेजुरी, प्रमोद राठोड–नाशिक व अविनाश पोइनकर-चंद्रपूर यांचा सहभाग राहणार आहे.

■ बाल आनंद मेळावा व गझल गायन

गुरूवार, दि.२६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वा. बालआनंद मेळावा आयोजित केला असून सुप्रसिद्ध कवी, बालसाहित्यिक प्रभाकर साळेगावकर माजलगाव हे शालेय विद्यार्थ्यांना कविता, गप्पागाणी, कथा सांगून मार्गदर्शन करतील रात्री ८ वा. हाज़िर-ए-ग़ज़ल हा गझल गायनाचा कार्यक्रम होईल. सुप्रसिद्ध गझल गायक पद्मश्री हरिहरन यांचे शिष्य प्रसिद्ध युवा गझल गायक भाविक राठोड, पुणे हे गझल गायन सादर करतील. युवा गायिका ऋतुजा वानखडे व सुवर्णा कोळी या गायनाला साथ देतील, धवल जोशी – बासरी, स्वप्नील जोशी – कीबोर्ड, मिलिंद शेवरे–गिटार हे साथसंगत करतील व नासिर खान हे निवेदक असणार आहेत.

शुक्रवार २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता ऐच्छिक विषय घेऊन ८–१० वी विद्यार्थ्यांची खुली चित्रकला स्पर्धा होईल व त्यानंतर बक्षीस वितरण होईल. २५ नोव्हेंबर रोजी शहरातील शाळा अंतरंगत रंगभरण स्पर्धा आयोजित केल्या जातील. यावेळी दोन्हीही स्पर्धांचे बक्षीस वितरण प्रसिद्ध चित्रकार अमृतराव टेकाळे गुरुजी यांच्या हस्ते होईल.

■ समारोप व पुरस्कार वितरण

याच दिवशी सायंकाळी ५.३० वाजता समारोप समारंभ होईल. सुप्रसिद्ध वक्ते, विचारवंत व माजी न्यायाधीश प्रकाश परांजपे, धुळे हे अध्यक्षस्थानी असतील. याच समारंभात यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार सर्वश्री पद्मश्री श्रीरंग दादा लाड – परभणी यांना कृषी, श्रध्दा बेलसरे (खारकर)–अंबाजोगाई यांना साहित्य, गंगाधार देव–नांदेड यांना संगीत व सुप्रसिद्ध तरुण गायिका कु. नंदिनी व कु. अंजली अंगद गायकवाड–तांदुळजा ह. मु . पुणे यांना संगीत युवा गौरव पुरस्कार प्रदान केले जातील.


■ शास्त्रीय संगीत सभा


याच दिवशी रात्री ८.३० वाजता पुणे येथील पण तांदुळजा येथील रहिवासी सुप्रसिद्ध युवा गायिका झी युवा संगीत सम्राट विजेती आणि क्लासिकल व्हाईस ऑफ इंडिया विजेती कु. नंदिनी गायकवाड व झी टिव्ही सारेगमप लिटिल चॅम्प विजेती व इंडियन आयडॉल फेम कु. अंजली गायकवाड यांचे शास्त्रीय गायनासोबत भावगीत,भक्तिगीत,गझल,नाट्यगीत सादर करतील. त्यांना अंगद गायकवाड संवादिनी, रोहन गोराने तबला, बंकटकुमार बैरागी–पखवाज व श्रीरूप धाट टाळाची साथसंगत करतील.


■ ग्रंथ विक्री व प्रदर्शन

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही ग्रंथ प्रदर्शन व विक्री आयोजित केले आहे. हे तिन्ही दिवस वाचक, रसिक व प्रेक्षकांना पाहता येतील. हे सर्व कार्यक्रम वेणूताई चव्हाण महिला महाविद्यालयात संपन्न होणार आहेत. रसिक श्रोत्यांनी सर्व कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन समितीचे दगडू लोमटे, डॉ. कमलाकर कांबळे, सतीश लोमटे, डॉ. प्रकाश प्रयाग, प्रा. सुधीर वैद्य, प्रा. शर्मिष्ठा लोमटे, प्रा. भगवान शिंदे, त्र्यंबक पोखरकर व राजपाल लोमटे यांनी दिली आहे.


यशवंतराव चव्हाण स्मृती समरोह अंबाजोगाई २०२६ चे पाहुणे, कवी व कलावंत


अतुल पेठे



न्या. प्रकाश परांजपे


पद्मश्री श्रीरंग लाड


श्रध्दा बेलसरे-खारकर


गंगाधर देव


कु.नंदिनी व अंजली गायकवाड


नितीन देशमुख


रंजना गायकवाड


प्रभाकर साळेगावकर


रोहित शिंगे


भाविक राठेड


ऋतुजा वानखडे


सुवर्णा माळी


अमृत टेकाळे

मायभूमीतील रुग्णांना सुविधा उपलब्ध करून देणे माझे कर्तव्य : सुनीलदादा चव्हाण

आष्टी ग्रामीण रुग्णालयातील वीज व्यवस्था अद्ययावत करण्यासाठी जाहीर केले अर्थसहाय्य

आष्टी प्रतिनिधी



आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ.रामदास मोराळे यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत चांगल्या पद्धतीने रुग्णांना सेवा देणारी टीम कार्यरत आहे.या रुग्णालयात येणाऱ्या अडचणी दूर करून नागरिकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसहाय्य देणे हे माझे आष्टीचे भूमिपुत्र म्हणून कर्तव्यच आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाचे सेवानिवृत्त जलसंधारण सचिव(मृद व जलसंधारण विभाग) तथा छत्रपती संभाजीनगरचे सेवानिवृत्त जिल्हाधिकारी सुनीलदादा चव्हाण यांनी केले.

आष्टी ग्रामीण रुग्णालयाला प्रत्यक्ष भेट देऊन येथील वीज व्यवस्था अधिक अद्ययावत व सुरळीत करण्यासाठी त्यांनी तातडीने वैयक्तिक भरीव अर्थसहाय्य जाहीर केले.त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन घोडके,डॉ. सिद्दीक बेग,डॉ. निखिल गायकवाड,युवा नेते संतोषभैय्या चव्हाण,रुग्ण कल्याण समिती सदस्य तथा ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे आणि सनियंत्रण समिती सदस्य जालिंदर पोकळे उपस्थित होते.पुढे बोलताना सुनीलदादा चव्हाण म्हणाले की,आष्टी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढती आहे. रुग्णांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर किंवा बीडला न पाठवता आता स्थानिक पातळीवरच उपचार मिळत आहेत. येथे डायलिसिस सारख्या अत्याधुनिक सुविधा देखील सुरू झाल्यामुळे परिसरातील रुग्णांची मोठी सोय झाली आहे. डॉ.मोराळे आणि त्यांचे सहकारी अत्यंत निष्ठापूर्वक काम करत आहेत. दरम्यान, वीजपुरवठ्यात अचानक अडचण निर्माण झाल्यामुळे मोबाईलच्या उजेडात शस्त्रक्रिया करावी लागल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचल्यापासून माझ्या मनात वीज व्यवस्था तातडीने सुरळीत करण्यासाठी हातभार लावण्याचा विचार आला.ही वीजपुरवठा व्यवस्था पूर्णपणे सुरळीत होईपर्यंत मी सर्वतोपरी वैयक्तिक भरीव अर्थसहाय्य देणार आहे. मायभूमीतील रुग्णांसाठी काहीतरी मदत करणे हे माझे कर्तव्य असून, यापुढेही या रुग्णालयासाठी सातत्याने मदत करण्यास मी तयार आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रास्ताविक प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांनी केले. डॉ. संतोष जावळे आणि डॉ.नितीन घोडके यांनी सुनीलदादा चव्हाण यांच्या या सढळ मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि त्यांच्या विश्वासास तंतोतंत पात्र राहून रुग्णसेवा करू, अशी ग्वाही दिली. आभार मानताना डॉ. सिद्दीक बेग यांनी सुनीलदादा चव्हाण हे एक सनदी अधिकारी असून त्यांनी आम्हाला नेहमीच मोलाचे मार्गदर्शन केले आहे. त्यांनी ग्रामीण रुग्णालयाला अर्थसहाय्य देऊन एक अत्यंत आदर्श पायंडा पाडला आहे असे गौरवोद्गार काढले.

दौरा दरम्यान सनदी अधिकारी सुनीलदादा चव्हाण यांनी रुग्णालयातील डायलिसिस सेंटरची पाहणी केली. या ठिकाणी दररोज १५ रुग्णांची अत्यंत व्यवस्थित सोय होत असल्याचे पाहून त्यांनी यावेळी विशेष समाधान व्यक्त केले आणि आपली लेखी प्रतिक्रिया नोंदवली.



अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्थेचे पाचवे प्रांतिक महा अधिवेशन कोल्हापुरात

परळी /प्रतिनिधी

अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्थेचे पाचवे प्रांतिक महा अधिवेशन कोल्हापुरात होत आहे. शनिवार दि. २६ डिसेंबर ते रविवार दि. २७ डिसेंबर २०२६ या दरम्यान या अधिवेशनाचे आयोजन कोल्हापूर जिल्हा स्वकुळ साळी समाज अंतर्गत स्वकुळ साळी समाज कोल्हापूर शहर हे करत आहेत.

या अधिनेशनेच्या निमित्ताने स्वागत समितीचे अध्यक्ष उद्योजक श्री उदय तुकाराम दुधाने, श्री दिलीप अरुण पोरे, श्री प्रशांत राजाराम पांढरपट्टे श्री अनिल शंकरराव भंडारे आणि श्री धोंडीराम गणपतराव पागडे आदींनी आज परळी शहरात समाज बांधवांची भेट घेतली.

प्रामुख्याने समाजाच एकत्रिकरण, संघटन महत्वपूर्ण असल्याचं उदय दुधाने यांनी यावेळी सांगितलं, सह पदाधिकाऱ्यांनी अधिवेशनाची होत असलेली तयारी, अधिवेशनातील महत्त्वपूर्ण विषय, युवा पिढीचा सहभाग याबाबत मुक्त चर्चा केली. परळी शहर सकूळ साळी समाजाच्या वतीने शहराध्यक्ष बालासाहेब बडकस, सचिव नितीन भंडारे, समाज बांधव नामदेव आरबोने, शिवाजी मंगलकर, सुदर्शन वडकर, ज्ञानोबा घट्टे, नारायण शिवगण, धनंजय आरबुने आदींनी या अधिवेशनास मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. दरम्यान कोल्हापुरातील या अधिवेशनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अनेक समाज बांधवांनी तयारी केल्याची माहिती स्वागताध्यक्ष उद्योजक उदय दुधाने यांना यावेळी देण्यात आली.